
ISSN2278-5914
Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara
(Inst. Reg. No. Maharashtra/13482/Satara/2010)
Research Booklet
SANSHODHAN
संशोधन

ISSN 2278-5914

# Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

(Inst. Reg. No.Maharashtra/13482/Satara/2010)
E-mail ID : sisms2010@gmail.com

Research Booklet

# SANSHODHAN
# संशोधन

* Chief Editor *

Dr. Vishvanath Pawar

* Co-Editorial Board *

Dr. Ajitkumar Jadhav
Dr. Jaypal Sawant
Prof. M.S.Nikam
Dr.Sumit Yadav
Prof. Mahadev Chinde

2018

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | सांगली जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा:<br>प्रा.विवेकानंद माने. | १ |
| २. | ऐतिहासीक व प्राचीन कराड<br>प्रा.ए.जी.थोरात | ४ |
| ३. | छत्रपती शिवाजी महाराजांचे शैक्षणिक धोरण<br>डॉ.मधुकर विठोबा जाधव | ९ |
| ४. | महाराष्ट्रातील सूफी संत<br>सौ.शर्वरी शैलेश कांबळे | १५ |
| ५. | न्यायनितिज्ञ अहिल्यादेवी<br>डॉ.सौ संगीता संपत पाटील | २१ |
| ६. | माधवराव पेशव्यांच्या दक्षिण धोरणाचे<br>मराठी राज्याला झालेले फायदे व परिणाम<br>प्रा.डॉ.आर.बी.सातपुते | २५ |
| ७. | धावडशीचे बह्मेंद्रस्वामी<br>प्रा.डॉ.दत्तात्रय ज्ञानदेव कोरडे | ३० |
| 8. | Balutedar :In accordance with Local History<br>Prof.Kiran Sarjerao Pawar | 35 |
| ९. | किल्ले सज्जनगड : एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप<br>प्रा.डॉ.दत्तात्रय जयसिंग ओवाळे | ३८ |
| १०. | संत तुकारामांचे धर्मचिंतन<br>श्री. महेशकुमार पांडुरंग सोनावणे | ४१ |
| 11. | Vachana Culture and Education for Modern Life<br>Dr.Nalini Avinash Waghmare | 47 |
| १२. | भारतीय जातीसंस्थेचा अन्वयार्थ आणि ऐतिहासिक विश्लेषण<br>डॉ.जयपाल चंद्रकांत सावंत | ५४ |
| १३. | कॉम्रेड के.आर.अक्कोळकर :<br>कोल्हापूर महानगरपालिकेतील एक जागृत नगरसेवक<br>प्रा.रामचंद्र वसंत कुंभार | ६६ |

# १२. भारतीय जातीसंस्थेचा अन्वयार्थ आणि ऐतिहासिक विश्लेषण

डॉ.जयपाल चंद्रकांत सावंत
शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज वाघोली
ता.कोरेगाव जि.सातारा

**प्रस्तावना :** भारतीय समाज जितका प्राचीन आहे तितकाच गुंतागुंतीचा आहे. भारतामध्ये गेली पाच हजार वर्षे ही समाजव्यवस्था असून जातीव्यवस्था ही संपुर्ण समाजव्यवस्था आणि संस्कृती या वास्तवाशी निगडीत आहे. भारतीय जातीव्यवस्था हे भारतातील सर्वात मोठे सत्य आहे. भारतीय समाजाची विभागणी आणि उपविभागणी गोंधळात टाकणारी आणि गुंतागुंतीची आहे. या व्यवस्थेचा अभ्यास करणारे विचारवंताही ही व्यवस्था सर्वांना समजून सांगता येईल याची खात्री देत नाहीत. 'देशाच्या विकासाला जात हा मोठा अडथळा होईल' असे डॉ.आंबेडकरांना वाटत होते. समाजातील एका मोठ्या वर्गाला हजारो वर्षे आर्थिक सामाजिक आणि सांकृतिक बंधनात अडकवून ठेवण्यात आलेले आहे आणि ही वस्तूस्थिती कोणीही नाकारू शकत नाही.

भारतात स्वातंत्र्यासोबच औद्योगिकरण आणि भौतिक विकास आला. यामुळे समाजात नवीन समाज विभागणी झाली. शेतीक्षेत्रात जरी जुना शेती न करणारा सरंजामदारवर्ग नष्ट झाला तरीही त्याचे रूपांतर भांडवलदार वर्गात झाले. असा भांडवलदारी पध्दतीने शेती करणारा जमीनदार श्रीमंत शेतकरी, मध्यम शेतकरी, मध्यम शेतकरी, लहान शेतकरी आणि भूमिहीन शेतकरी असे अनेक स्तर निर्माण झाले. औद्योगिकरणामुळे नव्या सामाजिक वर्गाची निर्मीती झाली. नव्या सामाजिक स्तरांची निर्मीती झाली परंतू जूने सामाजिकस्तर यामुळे नष्ट झाले नाहीत तर वर्ण आणि जातींच्या रूपाने होतेच. घटनेने भारतातील अस्पृश्यता कायद्यान्वये नष्ट केली परंतू वास्तवात अस्पृश्यता नष्ट झाली नाही तर जातीव्यवस्थेच्या रूपातील तिचे अस्तित्व आजही आहे. श्री.हं नागपाल हे आपल्या द स्टडी ऑफ इंडीयन सोसायटी या ग्रंथात एच.एन.स्टीव्हनसन यांनी Journal of Royal Anthropological Institute या ग्रंथांतील "Status Evaluation in the Hindu Caste System" या शोध निबंधात म्हणतात The Hindu caste system is unique, not because it embodies any unique model principles of social structure but because of many different principles of status evolution which validate it and which are inextricately interwoven to form the pattern of Hindu life.

**जातीव्यवस्था :** जात म्हणजे काय? : भारतीय जातीसंस्थेला जात हे नामाभिदान देण्याचे कार्य प्रथमतः पोर्तुगिज लोकांनी केले. भारतातील सामाजिक वर्गवारी स्पष्ट करण्यासाठी त्यांनी जात हा शब्द वापरला. पोर्तुगिजांच्या मते जात ही संकल्पना भारतीयांनी आपल्या रक्तातील शुध्दता कायम ठेवण्यासाठी वापरलेली आहे. Caste हा शब्द स्पॅनिश भाषेतील Casta या शब्दापासून तयार झालेला आहे. या स्पॅनिश शब्दाचा सहजपणे अर्थ सांगावयाचा झाल्यास वंश किंवा काही महत्वपुर्ण बाबी ज्या अनुवांशिकपणे परंपरेने चालतात असा होतो. एस.व्ही.केतकर यांनी History of Caste in India या ग्रंथात जात या शब्दाची माहीती देताना म्हणतात The word caste : This is of Spanish and Portuguese origin. Casta means pure. The Spaniards were the first to use it but its Indian Application is from Portuguese, who had so applied it in the middle of the fifteenth century.[२] याच ग्रंथात जातीची व्याख्या मांडताना ते म्हणतात "a social group having two characteristics: (i) membership is confined to those who are born of members and includes all persons so born ; (ii) the members are forbidden by an inexorable social law to marry outside the group".[3]

In the transition from Vedic religion to Hinduism proper, one important feature is the developmentof the stratified social system that in India became known as the caste system. Texts dating from thelate centuries before the Common Era, such as the Laws of Manu, began to make clear that the fourclasses found in the Vedas were now seen as stratified social entities. Rules and social laws beganto be passed down, not universally, but in terms of each class or "birth" (jati) division. Brahmins,here, were placed at the apex of the pyramid, because of their priestly positions. (However, they were also not allowed to accumulate large amounts of wealth and could not hold positions of direct political power.) Next were the warriors, or Kshatriyas, who held kingly and administrative power. The large body of the people, the Vish, or Vaishya, were farmers or merchants. The lowest class were the Shudras, born, it was thought, to be servants. As time went on and the tradition expanded its reach into all parts of India, indigenous tribes and other groups entering the society of Aryans were absorbed at an even lower rung of the social ladder. Eventually the concept of the untouchable (contemporary Dalit) was created to refer to people whom the upper castes would not even allow to be near or to touch them. Hinduism developed into a society where people became ranked rigidly by occupation. The sacerdotal position, or priestly work, was considered purest. Work that involved dealing with the dead, carrion, cleaning of sewers, sweeping, and other such tasks, was considered "unclean" and was performed only by hereditary untouchables.[4]Velassery, Sebastian, आपल्या "Casteism and Human

Rights: toward an Ontology of the Social Order या ग्रंथात म्हणतात "It can also be defined as an endogamous and hereditary subdivision of an ethnic unitoccupying a position of superior or inferior rank of social esteem in comparison with other such subdivisions.[5]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथात म्हणतात, प्राचीन काळी दळणवळणाची साधने अल्प असल्यामुळे लग्न आणि पौराहित्य संबंध दुरच्या ठिकाणी होत नसत कारण दुरच्या प्रदेशातील माहीती मिळण्यास अडचणी निर्माण होत असत त्यामुळे जवळच्या प्रदेशात लग्नसंबंध केले जात असत.हे ज्ञात असलेले म्हणून संबंध योग्य असे क्षेत्र जाती होय.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी Castes in India Their Mechanism, Genesis and Development या ग्रंथात सेनार्ट, नेशफिल्ड, रिश्ले आणि डॉ.केतकर यांच्या जातीव्यवस्थेच्या व्याख्या दिलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.

Mr. Senart, a French authori.y, defines a caste as "a close corporation, in theory at any rate rigorously hereditary : equipped with a certain traditional and independent organisation, including a chief and a council, meeting on occasion in assemblies of more or less plenary authority and joining together at certain festivals : bound together by common occupations, which relate more particularly to marriage and to food and to questions of ceremonial pollution, and ruling its members by the exercise of jurisdiction, the extent of which varies, but which succeeds in making the authority of the community more felt by the sanction of certain penalties and, above all, by final irrevocable exclusion from the group".

Mr. Nesfield defines a caste as "a class of the community which disowns any connection with any other class and can neither intermarry nor eat nor drink with any but persons of their own community".

H. Risley, "a caste may be defined as a collection of families or groups of families bearing a common name which usually denotes or is associated with specific occupation, claiming common descent from a mythical ancestor, human or divine, professing to follow the same professional callings and are regarded by those who are competent to give an opinion as forming a single homogeneous community".[6]याच ग्रंथात आंबेडकर जातीची निर्मिती कशी झाली हे सांगताना म्हणतात the final analysis creation of Castes, so far as Indiais concerned, means the superposition of endogamy on exogamy.[7]जेंव्हा एखादा वर्ग हा पुर्णपणे अनुवांशिकतेवर आधारित असतो तेंव्हा त्या वर्गास जात असे म्हणतात अशी व्याख्या कुले यांनी केली तर डॉ.इरावती कर्वे यांच्या मते विस्तृत संबंध असणारा आंतरविवाही

समूह म्हणजे जात तर मॅक्स वेबरच्या मते Caste is doubtlessly a closed group.[8] त्याचप्रमाणे ... a corporate group, exclusive and, in theory at least, rigorously hereditary. It possesses a certain traditional and independent organization, a chief and a council, and as occasion demands it meets in assemblies endowed with more or less full authority. Often united in the celebration of certain festivals, it is further bound together by a common profession and by the practice of common customs which bear more especially upon marriage, food, and various cases of impurity. Finally, it is armed, in order to assure its authority, with a jurisdiction of fairly wide extent, capable by the infliction of certain penalties, especially of banishment, either absolute or revocable, of enforcing the power of the community. Such, briefly, is the caste system.[९] अशा प्रकारची व्याख्या Emile Charles Marie Senart आपल्या कास्टस् इन इंडीया या ग्रंथात करतात.या सर्व विचारवंतांनी जातीची व्याख्या आपआपल्या पध्दतीने केलेली आहे. या सर्व व्याख्यांमध्ये आढळणारे सुत्र म्हणजे ज्या विशिष्ट संघामध्ये प्रवेश जन्मानेच होतो आणि अन्य कोणत्याही कारणाने होत नाही व ज्या संघातील लोकास त्या संघाबरोबर लग्न करता येत नाही त्या संघास जाती म्हणावे.[१०]

या जातीच्या सर्व व्याख्या किंवा अर्थ पाहिला असता आपण एका निर्णयावर येतो ते म्हणजे जातीसंस्था ही कायमस्वरूपी राहण्यासाठी जाती किंवा समुदायांतर्गत रोटीबेटी व्यवहार करण्यात आले. या समुदायात येणे हे फक्त जन्मानेच होऊ शकत असे आणि या समुदायातून वरच्या समुदायामध्ये जाणे शक्य नसे.

**जातीसंस्थेचा उदय :** चातुवर्ण्य व्यवस्थेचा सर्वात पहिला उल्लेख ऋग्वेदाच्या पुरूषसुक्तामध्ये आहे. याप्रमाणे प्रजापतीच्या मुखातून ब्राम्हण, बाहूतून क्षत्रिय, मांड्यांपासून वैश्य आणि पायापासून शुद्र निर्माण झालेले आहेत. अथर्ववेद, पंचविश ब्राम्हण ग्रंथ, वाजस्रेही संहीता, तैत्तरिय अराण्यक, महाभारत, वायूपुराण, मार्कंडेय पुराण, विष्णू पुराण, वशिष्ठ धर्मसुत्रे, बौध्दायन धर्मसुत्रे, मनुस्मृती आणि याज्ञवल्क्यस्मृती या विविध ग्रंथात हीच संकल्पना थोडयाफार फरकाने चर्चीलेली आहे.

वेदकाळात जाती अस्तित्वात होत्या कि नव्हत्या याबाबत विचारवंतांमध्ये मतभेद आहेत. जात या संकल्पनेत वर्णाचा अंतर्भाव करून वेदकाळात जातीसंस्था अत्यंत कर्मठ स्वरूपात असल्याचे मत Muir, Zjmmer, weber, Raguzln आणि Dr.Ghurye यांनी मांडलेले आहे तर Dr.Hang, Kern, Dr.Dutt आणि Dr. Apate यांनी या कालखंडात जातीप्रथा अस्तित्वात नव्हती असे मत मांडलेले आहे. Dr.Hang यांच्या मते या कालखंडात गुणकर्मावरून वर्ण ठरत असे व एका वर्णातून दुसया वर्णात जाता येत असे.[११] According to Manu the four original varnas were created from the mouth, arms thighs and feet respectively of Brahma. Then many castes or jatis were produced by series

of crosses first between the descendants of these initial unions.[12] Risley states "Assuming that the writers of the law books had before their eyes the same kind of social chaos that exists now, the first question that occurs to one is : -From what source did they derive the theory of the four caste? .....it is possible that the Brahmanical theory of castes may be nothing more than a modified version of the division of society into four classes – priests, warriors, cultivators and artisans- which appears in the sacerdotal literature of ancient Persia....It is not suggested that the Iranian legend of four classes formed part of the stock of tradition that the Aryans brought with them into India. Had this been so, the myth relating to their origin would have figured prominently in the Vedas, and would not have appeared solely in the Purusha Sukta which most critics agree in regarding as a modern interpolation. The conjecture is that the relatively modern compilers of the law books, having become acquainted with the Iranian legend, were fascinated by its assertion of priestly superemacy, and made use of it as the basis of the manifold complexities of the caste system"[13] As per Senart's theory about the origin of cast system. "The normal development of ancient Aryan institutions, which assumed a peculiar form because of the peculiar condition in India. It is not difficult to assign the beginning of caste system in the shape of varna division to Indo-Iranian period of history as the fourfold division of society is found both in the Avestan Persia and Rigvedic India. ......... From these Senart concluds that the leading Principles and characteristics of the caste system formed part of a stock of usage and tradition common to all branches of the Aryan race.[14] वर्णव्यवस्थेचे अतिरेकी व विकृत स्वरूप म्हणजे जातीसंस्था होय. वर्णव्यवस्थेतूनच कालांतरांनी नाना कारणांनी नाना जाती जन्मल्या असे मत प्रा.श्री.मा.कुलकर्णी यांनी मांडले आहे. वा.दा. मुंडले यांनीही असेच मत मांडले आहे. चार वर्णाच्या हजारो जाती झाल्या व प्राचीन वैदिक संस्कृती कोणत्याच जातीत उरली नाही. द.वा.निमकर यांचा कलसुध्दा वर्णातून जाती निर्माण झाल्या या मताकडे आहे. जातीभेद म्हणजे मुळ वर्णाश्रमधर्माचे विकृत दृश्य असे म.गांधी सांगतात पुढे ह्या वर्णश्रमातील लवचिकपणा नाहीसा झाला. त्यातील जीव नाहिसा होऊन लोक धर्माच्या नावाखाली शब्दाला कवटाळू लागले. वाढत्या रोगाप्रमाणे वर्णभेदी जोरावत जाऊन त्यांच्यापासून धंद्यावारी जाती झाल्या. त्या फुटुन त्यांची लहान लहान शकले होत गेली व ती एकमेकास दूर लोटून परस्परापासून दूर जाऊ लागली अशी ल.वि.परळभर यांची साक्ष आहे.[१५]

Dr.Nesfield, bring his occupational theory of caste origin according to him " caste originated in India long after the Aryan invaders had been absorbed in the mass of the native people and all racial distinction between

the two set of people, Aryan and aboriginal, had disappeared. Diferent tribes into guild castes, which then borrowed the principles of endogamy and prohibition of commensality from the customs of the old tribes and thereby solidified themselves into isolated units. The ranking of any caste as high or low depends upon whether the industry represented by the caste belongs to an advanced or backward stage of culture.Thus the caste following the most primitive occupation like hunting, fishing, basket-making etc., are regarded as lowest, the metal-workers, agriculturists, and traders are higher in rank, while the highest is of those who are priests and teachers. Lastly, Nesfield states that " the old four-fold varna division was never actually in fource in India except as a current tradition, the only reality which attaches to it to this day."[16]

By the seventh and sixth centuries b.c., the valley of the Ganges waspopulated by Aryanand non-Aryan tribes, the more primitive not yetexposed to brahman ritual. Exploitation of the shudra had begun and therudiments of stratification were visible. The vanquished dasas were includedin the Aryan social structure, usually as shudras, the fourth andlowest of the caste orders, although they were forbidden to participate inthe sacrifice. The three higher castes, collectively known as aryas, hadcome to be considered "twice-born" which meant that their memberswere eligible for rebirth through ceremonial initiation. Eventually thatportion of the native population not incorporated into the shudra stratum(and outside the caste order altogether) appears in the literature as thenisada, a group with which the Aryans had some intercourse, and theincorrigible pukkasa and candala, who were held in contempt. Thissocial system, based on complex occupational, status, and religious differentiations,still influences Indian life. The status and defining features ofthe brahmans have undergone less modification than those of the othergroups, whose functional and status significance has been altered throughthe years.[17]

डॉ.रा.गो.भांडारकर यांच्या मते जातींच्या अस्तित्वाला पुरातन काळी आधार नसून त्या नंतर सुरू झाल्या. बापाचा धंदा चांगला जमतो म्हणूनच तो करण्याची प्रथा पडली व त्यामुळे जन्मजात धंदे सुरू झाले. अशा तऱ्हेने धंदे करणाऱ्यांची तीच जात झाली. आरंभी या चारच जाती असून त्यांत भेदभाव नव्हता परंतू पुढे मात्र स्थान भेद, देश भेद, प्रांत भेद, खाण्यापीण्यातील भेद, पोषाखातील भेद इत्यादींमुळे विभिन्न जाती झाल्या व त्यांच्यात रोटीबेटीव्यवहार होणे शक्यच नाही अशी स्थिती आली.[१८]

**जात आणि वर्ण यातील भेद :** भारतीय जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था यामध्ये नेहमीच

गफलत होत असते. भारतात वर्गव्यवस्था फार पुर्वीपासून अस्तित्वात आहे. वैदिक कालखंडामध्ये ज्यांचे उपनयन होत असे त्यांचा आणि ज्यांना उपनयनाचा अधिकार नाही अशा लोकांचा वेगळा वर्ग होता. तर पुढील कालखंडात जमिनदार आणि सामंतांचा किंवा मिरासदारांचा एक तर ज्यांना शेती नाही व जे उपरे आहेत त्यांचा एक वर्ग होता.याविषयी डॉ.जयशंकर मिश्र म्हणतात, ''भारत मे इस प्रकार के वर्ग प्राचिन कालसे रहे है वैदिक काल मे व्दिजो का उच्च वर्ग और शुद्रो का निम्न वर्ग था परवर्तीकाल मे भूस्वमियो अथवा सामंतो और किसानो का तथा श्रेष्ठीयो से संबंधीत था और व्यवसाय के माध्यम से अनेक वर्गो का विकास हुआ और इनका सस्तरण विशुध्द रूप से आर्थिक आधार पर निर्भर रहा है।'' [१९]

१. वैदिक धर्मात सुरूवातीला वर्णव्यवस्था ही सैल स्वरूपाची असून वर्णांतर सहजासहजी करता येत असे परंतू सनपुर्व पाचसहाशे वर्षापुर्वीच वैदिकांची त्यांच्यातील वर्णव्यवस्था अपरिवर्तनिय झाली. अवैदिकांची जातीव्यवस्थाही जवळपास सन हजारपर्यंत अत्यंत सैल स्वरूपाची असून कोणीही कोणताही व्यवसाय (जात) स्विकारू शकत असे. कालौघात अनेक नवनवे व्यवसाय आले तशा जाती वाढत गेल्या तर काही व्यवसाय नष्ट झाले तशा जातीही नाहीशा झाल्या. किमान दहाव्या शतकापर्यंत तरी जातव्यवस्था अत्यंत सैल व परिवर्तनशिल असल्याचे दिसते. म्हणजे वैदिक धर्मातील वर्णव्यवस्था जातीसंस्थेच्या हजारेक वर्ष अगोदरच अपरिवर्तनीय बनली होती पण तिचा परिणाम शैवप्रधान धर्मावर न होता त्यांची व्यवसायधिष्टीत जातीव्यवस्था मात्र सैलच राहीली.

२. वर्ण हे ईश्वरनिर्मित होत अशी पुरूषसुक्तप्रणित घोषणा आहे. जातीव्यवस्था मात्र सर्वस्वी समाजनिर्मीत आहे. कारण तिच्या निर्मितीबाबत कोणतीही धार्मिक उद्‌घोषणा नाही. बहुतेक जाती(आदिवासीही) आपला उगम शिवापासून झाल्याचे मानतात हे ही येथे माननिय आहे.

३.परंतू वर्णाची ईश्वरप्रणित रचना हेच मुळात मिथक आहे.त्याला कसलेही वैदिक समर्थन नाही. ज्या पुरूषसुक्तामुळे वर्णव्यवस्थेला पावित्र्य दिले गेले ते ऋग्वेदात प्रक्षिप्त आहे, ते बनावटपणे उत्तरकालात कोणितरी घुसवले आहे.परंतू याच सुक्तामुळे आणि स्मृतींच्या प्रचारामुळे वर्णव्यवस्थेला वेदमान्यता आहे असे दाखवले गेल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

४. वर्णलोप होऊ शकतो परंतू दहाव्या शतकानंतर जातीलोप दिसून येत नाही.

५. स्मृतींमुळे अथवा पुराणांमुळे निर्माण झालेल्या प्रभावामुळे प्रत्येक जात आपण कोणत्या ना कोणत्या उच्चवर्णिय मुळाचेच आहोत असे मानत असते मग त्याला समाजमान्यता असो अथवा नसो अनेक जातींच्या पुराणांवरून ही बाब सिध्द होते.

६. वैदिक व्यवस्था पाहिली तर सर्व जाती चार वर्णात विभागल्या गेलेल्या नाहीत सवर्ण जातींची संख्याही मोठी आहे. वर्णव्यवस्थेनुसार पाचवा वर्ण अस्तित्वात नाही आणि दोन वर्ण तर नष्ट झालेले आहेत. मग अवर्ण जातींच्या निर्मितीची सांगड कशी घालायची? थोडक्यात वैदिक

वर्णव्यवस्था ही संपुर्ण भारतीय समाजव्यवस्थेला सामावून घेणारी नसून तीच्याकडे मर्यादित परिप्रेक्षातच पहावे लागते.

७. स्मृतींनी वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार केला आहे.शुद्रांनी त्रैवर्णिकांची कसल्याही लाभाची अपेक्षा न ठेवता सेवा करावी व उपजिविकेसाठी धान्योत्पादन, पशुपालन, व्यापार, चित्रकला, नृत्य, गाणे, वीणासारंग, ढोल इ.वाद्ये वाजवणे असे सांगितले आहे. प्रत्यक्षात या आज्ञा वैदिकांचा सेवकवर्ग सोडता वैदिकेतरांसाठी लागू नव्हत्या. त्या वैदिकेतर धर्माच्या धर्माज्ञा नसल्याने ते पाळणे शक्यही नव्हते. उदा. शुद्र वर्णांच्या अनेकांनी राज्ये स्थापली होती. नंद, मौर्य, यादव इ.असंख्य राजघराणी शुद्र होती व त्यांना स्मृतीतील आदेशांचा कसलाही प्रत्यवाय आलेला दिसत नाही. याचे कारण म्हणजे वैदिक धर्माची व्याप्ती जनजीवनात मर्यादित होती.

८. बव्हंशी शुद्र मानल्या गेलेल्या जातींची पुराणे पाहिली असता बहुतेक जातींची निर्मीती शिवपार्वतीपासून शिवाचा घर्मबिंदू, अश्रुबिंदू अथवा जिव्हेपासून झाल्याच्या उत्पत्तीकथा येतात. या उत्पत्तीकथा त्यांच्या आदिम शैवप्रधान धर्माचे अंश म्हणता येतात. तसेच सर्वच अवैदिकांची कुलदैवतेही शिवपरिवारातील आहेत हेही त्यांच्या पुरातन धर्मश्रध्दांचे सूचन करते.[२०]

या विवेचनावरून आपण वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था यातील फरक अतिशय जाणिवपुर्वक पाहू शकतो. या दोन्ही पध्दती दोन वेगवेगळ्या धर्मसंरचेतून आलेल्या असल्याचे दिसते. वर्णव्यवस्था हि वैदिक धर्माची देणगी असून जातीव्यवस्था ही अवैदिक शैवप्रधान समाजातून आलेली असल्याचे दिसते.

**भारतीय जातीसंस्थेची वैशिष्ठ्ये :** खरे पाहीले असता भारतीय जातीसंस्थेचा अन्वयार्थ समजण्यासाठी आपणाला या संकल्पनेच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय जातीव्यवस्थेची अशी काही वैशिष्ठ्ये आहेत की ज्यांना अभ्यासल्याशिवाय जात ही संकल्पनाच समजणे अवघड आहे. According to the Ghurye " Hindu society is divided into groups known as Caste with varying degrees of respectability and circles of intercourse. The outstanding features of Hindu society when it was ruled by the social philosophy of Caste, unaffected by the modern ideas of rights and duties, may be discerned to be six: (1) Segmental division of society 2. Hierarchy 3. Restrictions on feeding and social intercourse 4. Civil and religious disabilities 5. Lack of unrestricted choice of occupation 6. Restriction on marriage.[21] हटन आपल्या Caste in India या ग्रंथात जात या संकल्पनेची वैशिष्ट्ये मांडताना म्हणतात, Normally Caste conforms to the following criteria : (i) A Caste is endogamous. (ii) There are restrictions on commensuality between members of different castes. (iii) There is a hierarchical grading of the Brahman at the top. (iv) In various kinds of contacys, especially those concerned with food, sex and ritual, a member of a high caste is

liable to be polluted by either direct or indirect contact with a member of a low caste. (v) Caste are very commonly associated with a traditional occupation (vi) A man's status is determined by the circumstance of his birth, (i.e. the caste in which he is born) unless he is expelled from his caste for some ritual offence. (vii) The system as a whole is always focussed around the prestige.[22]

थोडक्यात जातीसंस्थेच्या वैशिष्ट्यांचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल.

१. जात ही जन्माधिष्ठीत असून मृत्यूउपरांतही ती बदलत नाही किंवा नष्ट होत नाहीत.

२. समाजाची जातीनिहाय विभागणी.

३. जातीव्यवस्थेमध्ये उतरंड आहे.

४. कनिष्ठ जातीतील व्यक्तिंना सामाजिक व धार्मिक क्षेत्रातून जाणिवपुर्वक दूर ठेवण्यात आले.

५. व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नाही.

६. सामाजिक संबंध, सहभोजन व वैवाहीक संबंधावर नियंत्रण ठेवण्यात येते.

७. सामाजिक व धार्मिक बंधने आणि विशिष्ठ जातीला विशेषाधिकार.

जातीसंस्था ही कोणत्याही व्यक्तिला जन्मासोबतच प्राप्त होत असते व्यक्तीचा जन्म ज्या मातापित्याच्या पोटी झालेला असेल त्यांचीच जात ही त्या व्यक्तीला प्राप्त होत असते.

एका जातीतून दूसऱ्या जातीमध्ये व्यक्तिला जाता येत नाही जर त्या व्यक्तीने ही आपली जन्मापासून प्राप्त झालेली जात बदलण्याचा प्रयत्न केला तर त्याची जात बदलत नाही शिवाय त्याने आपली जात बदलण्याचा प्रयत्न केला यामुळे त्याला समाजाकडून वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा केल्या जात असत. या शिक्षांची तिव्रता त्या व्यक्तीच्या मुळ जातीवरती अवलंबून असत.

या संकल्पनेमध्ये उतरंड आहे. सर्वात वरच्या ठिकाणी ब्राम्हण आहेत आणि सर्वात खालच्या स्तरावर शुद्रातीशुद्र आहेत. या उतरंडीमध्ये वरून खाली येणे एखादेवेळी शक्य आहे मात्र खालच्या स्तरावरील कोणीही वरच्या स्तरावर जावू शकत नाही.

जातीव्यवस्थेतील खालच्या स्तरावरील लोकांना जाणिवपुर्वक सामाजिक व धार्मिक क्षेत्रापासून दूर ठेवण्यात आले आणि त्यांना या क्षेत्रापासून दूर राहणे नियती असून त्यांनी त्याचे योग्य रित्या पालन केल्यासच त्यांना मुक्ती मिळू शकेल असा विश्वास त्यांच्यात निर्माण केला. यामुळे शुद्रातीशुद्र लोक धार्मिक कार्य आणि शिक्षण यापासून अलिप्त राहीले.

या व्यवस्थेमध्ये व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य व्यक्तिला मिळत नाही. ज्या जातीत जन्माला आलेला असेल त्याच जातीचेच काम किंवा व्यवसाय व्यक्तिला स्विकारावा लागतो. अन्य जातीचा व्यवसाय केलेला समाजमान्य होत नाही किंबहूना त्यास स्विकारलेच जात नाही.

एका पंक्तिला बसून भोजन करणे किंवा वैवाहीक संबंध हे फक्त आपल्या जातीतच केले जाते. हे दोन्ही व्यवहार ज्या व्यक्तिसोबत केले जातात तो व्यक्ति आपल्या समकक्ष आहे काय याची प्रथमतः चाचपणी केली जाते व मगच असे संबंध ठेवले जातात.

भारतीय वर्णव्यवस्थेनुसार ब्राम्हण वर्ण हा सर्वश्रेष्ठ गणला जातो. या वर्णाला प्रथमपासून काही विशिष्ठ अधिकार मिळालेले आहेत. जसे शिक्षणाचा अधिकार आणि धार्मिक विधींचा अधिकार आहे. मराठी भाषेत एक म्हण रूढ झालेली आहे ती अशी की ब्राम्हण झाला कितीही भ्रष्ट तरीही तो तिन्ही लोकी श्रेष्ठ. या एका म्हणीवरून या समाजाला असणारे विषेशाधिकार स्पष्ट होतात. तर याउलट अस्पृश्य समजल्या जाणा-या वर्गाला मंदीरातही प्रवेश नाकारला गेला. ज्या ठिकाणी प्राण्यांचा प्रवेश होऊ शकत असे त्या ठिकाणी अस्पृश्य वर्गाला प्रवेश नाकारला जात असे.

**निष्कर्ष :**

भारतीय जातीव्यवस्था हा भारताला लागलेला एक असा असाध्य रोग आहे ज्याचे वेळीच निदान केले गेले नाही तर याचे गंभीर परिणाम भोगावे लागणार आहे.आपल्या जातीव्यवस्थेमधील विकृतीच्या गोंधळाचा कळस जर कोठे पहावयास मिळत असेल तर तो अस्पृश्यतेमध्ये होय. हा स्पर्शाचा विचार आणि जन्मसिध्द उच्च निच्चतेची भावना जशा प्रकारे भारतात विलक्षणपणे रूढ झाली आहे व आजही ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्व टिकवून आहे तशी ती इतर कोणत्याही देशात आज दिसत नाही.याबाबत सांगताना पं.लक्ष्मणशास्त्रीजोशी म्हणतात हिंदूधर्मात जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था या अनुदारतेच्या मुर्ती आहेत. कारण जर यात उदारता असती तर शुद्रदास्य अस्पृश्यता जातीची जन्मजात उच्चनिचता इ.हजारो वर्षे टिकून राहिलेले अनुदार व जुलमी कायदे हिंदूधर्माचे मुख्य भाग बनले नसते आणि वैदिक धर्मांचे परिपालन करण्यास शुद्रादिकांना हरकत घेणारे व त्याकरता देहांन्त शिक्षा सांगणारे कायदे स्मृतीत सांगितले नसते. या संकिर्ण हिंदूधर्माला जगवण्याचे कार्य पुरोहित ब्राम्हण वर्गाने दिर्घ कालापर्यंत केले. हीन धर्मावर जगणारा पुरोहितवर्गच या धार्मिक गोंधळास व जातीसंस्थेस जबाबदार आहे.[१३]

जातीसंस्थेच्या उदयाची विविध विद्वानांनी केलेली व्याख्या पाहता जातीसंस्था हा असा विशिष्ठ वर्गसमुह आहे ज्या वर्गसमुहाचे त्या वर्गसमुहाबाहेर रोटी आणि बेटीचे कोणतेही व्यवहार होत नाहीत. या संस्थेच्या निर्मिती तसेच विकासाचे कारण म्हणजे आंतरजातीय वा आंतरवर्गीय विवाहाऐवजी जातीअंतर्गत होणा-या विवाहांची संख्या ही लक्षणिय असणे होय. या वर्गसमुहात जन्माशिवाय कोणत्याही कारणाने प्रवेश मिळत नाही व कोणत्याही जातीतून वरच्या जातीत जाता येत नाही.

वर्णव्यवस्थेचा आरंभ ऋग्वेदाच्या पुरूषसुक्तामध्ये आढळतो ज्यात वर्णव्यवस्थेचा आरंभ प्रजापतीच्या विविध अंगांपासून झाल्याचे प्रतिपादित होते.वेदकाळात जाती अस्तित्वात होत्या

कि नव्हत्या याबाबत विचारवंतांमध्ये मतभेद आहेत. जात या संकल्पनेत वर्णाचा अंतर्भाव करून वेदकाळात जातीसंस्था अत्यंत कर्मठ स्वरूपात असल्याचे मत काही विचारवंत मांडतात तर काही विचारवंत या कालखंडात जातीप्रथा अस्तित्वात नव्हती असे मत मांडतात. Dr.Hans यांच्या मते या कालखंडात गुणकर्मावरून वर्ण ठरत असे व एका वर्णातून दुसऱ्या वर्णात जाता येत असे. सुरूवातीच्या कालखंडातील काहीशी का होईना असणारी लवचिकता पुढे काळाच्या ओघात नष्ट होऊन पिढीजात चालणारे व्यवसायास अनुसरून काम करणारे त्या विशिष्ठ जातीचे झाले.काही संशोधकांच्या मते वर्णव्यवस्था हि वैदिक धर्माची देणगी असून जातीव्यवस्था ही अवैदिक शैवप्रधान समाजातून आलेली असल्याचे दिसते.

या संकल्पनेच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करता आपणास हे जाणवते की जात ही संकल्पना जन्माधिष्ठीत असून मृत्यूउपरांतही ती बदलत नाही किंवा नष्ट होत नाहीत. यामुळे समाजाची जातीनिहाय विभागणी झालेली आहे.या जातीव्यवस्थेमध्ये उतरंड आहे व यामध्ये कनिष्ठ जातीतील व्यक्तिंना सामाजिक व धार्मिक क्षेत्रातून जाणिवपुर्वक दूर ठेवण्यात आले.यांना व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नाही यांच्या सामाजिक संबंध सहभोजन व वैवाहीक संबंधावर नियंत्रण ठेवण्यात येते तसेच काही विशिष्ठ जातीला सामाजिक व धार्मिक बंधने आणि विशेषाधिकार मिळालेले आहेत यामुळे या विशिष्ठ जातीसमुहांचाच विकास झाला हे स्पष्टपणे जाणवते.आणि या संकल्पनेचा मुळापासून विनाश करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी केलेले जातीसंस्थेचे विश्लेषणच आपणास व्यवहारात आणवे लागेल तेव्हांच या समाजातील भेदभाव नष्ट होतील.

**संदर्भ सूची :**


1. Nagpaul Hans, The Study of Indian Society, S.Chand . Co.(Pvt.)LTD. New Delhi-55, 1972, Page No.83
२. एस.व्ही.केतकर, History of Caste in India, Rawat publications, Jaipur. Reprinted in 1979 Page No.12
३. एस.व्ही.केतकर, History of Caste in India, Rawat publications, Jaipur. Reprinted in 1979 Page No.15
4. Constance A. Jones and James D. Ryan, Encyclopedia of Hinduism, An imprint of Infobase, Publishing 132 West 31st Street New York NY 10001, 1961 Page No.22
5. Velassery, Sebastian, "Casteism and Human Rights: toward an Ontology of the Social Order," Singapore: Marshall Cavendish Academic, xvii, 2005, Page No.229
6. Vasant Moon,(Compiled), CASTES IN INDIA Their Mechanism Genesis and Development DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES VOL.1, Publisher: Dr. Ambedkar

Foundation Ministry of Social Justice. Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi, Re-printed by Dr. Ambedkar Foundation : January, 2014 Page No.6-7

7. कित्ता, Page No.9
8. प्रा.सोमवंशी बी.सी., भारतीय जातीसंस्थेत मातंगाचे स्थान आणि महार-मांग संबंध, आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद, १९८९ पृ.९
9. Emile Charles Marie Senart, Caste in India, trans, by E. Denison Ross,. London, 1930 Page No. 20.
10. डॉ.केतकर व्ही.एस., महाराष्ट्रीय ज्ञानकोश विभाग १४ पृ.११४
11. Dr.B.R.Kamble, Caste and Philosophy in pre-Buddhist India, Parimal Prakashan, Aurangabad, 1979, Page No.10-15.
12. Dr.Dutt N.K. Origin and growth of caste in India Vol.1, Firma K.L.Mukhopadhay, Culcutta,1960 Page No.24
13. कित्ता, Page No.13-14.
14. कित्ता,Page No.15-16
15. डॉ. मांडवकर भाऊ, चातुर्वर्ण्य, सेवा प्रकाशन, अमरावती, १९९४, पृ.६५
16. Dr.Dutt N.K., उपरोक्त, Page No.20-21
17. Drekmeier Charles, Kingship And Community In Early India,Stanford University Press Stanford, California Bombay: Oxford University Press 1962 Page No.29
18. डॉ. मांडवकर भाऊ, चातुर्वर्ण्य, सेवा प्रकाशन, अमरावती, १९९४, पृ.६४
19. डॉ.जयशंकर मिश्र, प्राचिन भारत का सामाजिक इतिहास, हिंदी कार्यन्वयन निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, पृ.१६१
20. सोनवणी संजय, जातिसंस्थेचा इतिहास, प्राजक्त प्रकाशन, पुणे, २०१४ पृ.२३२४.
21. Hutton J H Caste in India, Oxford University press, London, Second Edition, 1951, Page No.45-91
22. Ghurye G.S., Caste and Race in India, Kegan Pauk, Trench, Trubner . Co., LTD., London, 1982, Page No.2-27
23. जोशी पं.लक्ष्मणशास्त्री, हिंदुधर्माची समीक्षा, प्राज्ञ पाठशाळा प्रकाशन, वाई, पृ.१६७-१७०